# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### कळंब (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी नुकसानाची रक्कम मिळण्याबाबत

**(१) ११०३६ (०४-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील ५५ हजार शेतकऱ्यांपैकी केवळ तीन हजार शेतकऱ्यांनी राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडले असल्याने उर्वरित शेतकऱ्यांना या वर्षीच्या दुष्काळी नुकसानाची देय असलेली रक्कम अद्याप देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागाने बॅक सदर खातेची अट शिखिल करुन नुकसानीची रक्कम देण्याबाबत शासानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

कळंब तालुक्यातील ५९३७४ बाधित शेतकऱ्यांना सन २०१५ च्या खरीप दुष्काळासाठी रूपये ४६.३५ कोटी निधी वाटप करण्यात आला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीत विनापरवाना वाणिज्य व औद्योगिक कारणासाठी जागेचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांना नोटिसा बजावण्यात आल्याबाबत

**(२) ४३३२१ (१७-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीत विनापरवाना वाणिज्य व औद्योगिक कारणासाठी जागेचा वापर करणाऱ्या मिळकतधारकांना अकृषक सारा ५ पट रुपांतरित कर व ४० पट दंडाच्या सुमारे २७ हजार व्यावसायिकांना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान नोटिसा बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नोटिसींवर खुलासा अथवा दंड प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, ४० पट दंड भरण्यास व्यापाऱ्यांनी विरोध दर्शविला असून, दंड रकमेच्या सवलतीबाबत व्यापाऱ्यांनी मा.पालकमंत्र्यांना निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर दंड रकमेमध्ये सवलती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) कोल्हापूर शहरामध्ये जमिनीच्या अनधिकृतरित्या औदयोगिक व वाणिज्यिक कारणाकरिता वापरात बदल केल्या प्रकरणी जिल्हा प्रशासनाने अनधिकृत अकृषिक दंड व रुपांतरीत कर वसुलीच्या सुमारे १७,०३० इतक्या नोटीस बजावल्या. त्यानुसार २३६ मिळकतधारकांनी खुलासा सादर केला आणि ६४६ मिळकतधारकांनी बिगरशेती सारा व दंड यापोटी रु.१,०४,९०,५३३/- इतकी रक्कम शासनास प्राप्त झाली आहे. तसेच, काही मिळकतधारकांनी ४० पट दंड आकारण्यापासून सवलत देण्याची विनंती केली होती. या विनंतीस अनुसरुन, शासनाने शासन निर्णय क्र.एनएए-२०१६/ प्र.क्र.२०९/टि-१,दि.१/४/२०१७ अन्वये विशिष्ट प्रयोजनासाठी ४० पट ऐवजी २० पट अकृषिक आकारणी करण्याबाबत निर्देशित केले आहे. सदर, शासन निर्णय दि.१/४/२०१७ अन्वये, २२१ मिळकत धारकांनी बिगरशेती सारा व दंड रक्कम, या पोटी रु.४६,५२,०५७/- इतकी रक्कम शासनास भरणा केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दर्यापूर मतदारसंघातील (ता.अंजनगाव (सुर्जी), जि.अमरावती) पानपिंपरी या वन औषधी पिकांची नोंद पिक विम्यामध्ये समाविष्ट करण्याबाबत

**(३) ४६६११ (२८-०४-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर मतदारसंघातील (ता.अंजनगाव (सुर्जी), जि.अमरावती) पानपिंपरी या वन औषधी पिकांची नोंद पिक विमामध्ये समाविष्ट करण्याबाबत शहराध्यक्ष मनोहर मुरकुटे यांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी व संबंधित कृषी विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पानपिंपरी या वन औषधी पिकांची नोंद पिक विमामध्ये समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) पुनर्रचित हवामान आधारित पिक विमा योजनेंतर्गत वन औषधी पानपिंपरीचा समावेश तांत्रिक निकषाच्या अनुप्लब्धतेमुळे शक्य नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील केळींच्या बागा वाहून गेल्याबाबत**

**(४) ५८१८३ (२०-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यात केळीसाठी हरितपट्टा म्हणून नांदेड, हिंगोली व परभणी या तीन जिल्ह्यातील तालुक्यांचा समावेश असून हा हरितपट्टी पाणी व तापमानामुळे होरपळून गेला असून १ ते दिड हजार एकरावरील केळींच्या बागा वाहून गेल्यामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांची किमान १० ते १५ कोटीच्या लागवडी खर्चाचा शेतक-यांचे नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) सन २०१५ मधील दुष्काळाच्या अनुषंगाने खरीप पिकासाठी कोडवाहू पिकासाठी नांदेड जिल्ह्यास रू.३६७.३७ कोटी इतका निधी प्राप्त असून रूपये ३६५.६५ कोटी इतका निधी ६,६०,७४३ इतक्या शेतकऱ्यांना वाटप करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यासाठी बागायत पिकांसाठी रूपये ५५.५४ कोटी व फळपिकासाठी रूपये ३.४२ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून २,३८२ शेतकरी (फळपिक) यांचे खात्यात रक्कम रूपये २,५७,२२,१७७/- इतका निधी वर्ग करण्यात आला आहे. ता.अर्धापूर, जि.नांदेड येथील १५४ खातेदारांना फळपिकांच्या नुकसानीसाठी रूपये २०.०५ लक्ष निधीचे वाटप करण्यात आले आहे.

---

**भोकर (ता.जि.नांदेड) विभागातील फळबागाधारकांचे झालेले आर्थिक नुकसान देण्याबाबत**

**(५) ५८१९१ (२२-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (ता.जि.नांदेड) विभागात मागील दोन वर्षापासून पाऊस न आल्याने रब्बी, खरीप, हंगाम करपला असून शेतकऱ्यांवर प्रामुख्याने फळबागाधारकांचे नुकसान झाले असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती उक्त विभागातील फळबागाधारकांचे झालेले आर्थिक नुकसान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

खरीप २०१५ करीता नांदेड जिल्ह्यासाठी ३६७.६७ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यापैकी रूपये ३६५.६५ इतका निधी ६,६०,७४३ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आला आहे. यामध्ये भोकर तालुक्यातील ३५,३६४ शेतकऱ्यांच्या खात्यात रूपये १७.४८ कोटी इतका निधी जमा करण्यात आलेला आहे.
(३) नांदेड जिल्ह्यासाठी खरीप २०१५ (बागायत व फळपिक) करीता ५८.९६ कोटी निधी देण्यात आला होता. त्यापैकी रूपये ५६.१२ कोटी इतका निधी ७५,७९५ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आला आहे. यामध्ये भोकर तालुक्यातील २,५५२ शेतकऱ्यांना रूपये १.६१ कोटी इतका निधी प्रदान करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## म्हाडाच्या सदनिका, भुखंडांची सात-बारावर नोंद करताना मूळ मालकांचे नाव नसल्यामूळे खरेदी-विक्रीत अडचण येत असल्याबाबत

**(६) ६१२३० (२९-०८-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या सदनिका, भुखंडांची सात-बारावर नोंद करताना मूळ मालकांचे नाव नसल्यामूळे खरेदी-विक्रीचे दस्त प्रलंबित असून याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान बैठक होऊन निर्णय झाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) इ-फेरफार आज्ञावलीद्वारे नोंदणी विभागाकडे दस्तऐवज नोंदविताना दस्तऐवजामधील गा.न.नं.७/१२ वरील वर्णन इत्यादी बाबी मिळकत ऑनलाईन दिसल्याशिवाय दस्तऐवज नोंदणी करु नयेत असे संकल्पित आहे. त्याअनुषंगाने दुय्यम निबंधक हे गा.न.नं.७/१२ ऑनलाईन व्हिव झालेशिवाय दस्तऐवजाची नोंदणी करत नव्हते, मात्र पक्षकार यांच्या तक्रारी वरुन सह

जिल्हा निबंधक कोल्हापूर यांनी माहे जून, २०१६ मध्ये झालेल्या मासिक सभेमध्ये सर्व दुय्यम निबंधक यांना म्हाडा/सिडको यांच्या मिळकतीबाबतचे दस्त आज्ञावलीतील सदर टप्पा स्किप करुन (वगळून) पूर्ण करावेत अशा सुचना दिलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहाडी व तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील ओव्हरलोड गौनखनिज भरणाऱ्या घाट मालकावर कारवाई करण्याबाबत**

**(७) ६३८५५ (१९-०८-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहाडी व तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील रॉयल्टी असलेल्या रेतीच्या ट्रक चालकावर ओव्हरलोडची कारवाई केली जात असून या अधिकृत घाट मालकावर शासनाकडून कोणतीच कारवाई केली जात नसल्याची तक्रार लोकप्रतीनिधिंनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २३ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत घाट मालकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय दि.०३/०१/२०१८ च्या विवरणपत्रातील अटी व शर्तीनुसार लिलावस्थळातील रेती/वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनाच्या क्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू अवैध आहे, असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कार्यवाही करावी व दंडनीय कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात यावा अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार अतिभारापोटी कारवाई संबंधित वाहन चालकावर होते. लिलावाच्या अटी/शर्ती चा भंग झाल्यास किंवा वाळूनिर्गती धोरणातील तरतूदीचा भंग केल्याचे आढळल्यास प्रकरणपरत्वे संबंधित वाळूघाट धारकाविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माजलगाव (जि.बीड) येथील तहसिल कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या गैरहजेरीबाबत**

**(८) ६४०१० (१९-०८-२०१६). श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) येथील तहसिल कार्यालयात दिनांक १४ जुन, २०१६ रोजी वा त्यासुमारास कार्यालयीन वेळेत तहसिलदार, नायब तहसिलदार व अनेक अधिकारी कर्मचारी गैरहजर असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनीधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त तक्रारीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०२-२०१९) :** (१) दिनांक १४ जून, २०१६ रोजी तहसिल कार्यालय माजलगांव, जि.बीड येथे कार्यालयीन वेळेत तहसिलदार, नायब तहसिलदार व अव्वल कारकून गैरहजर होते, असे आढळून आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) जिल्हाधिकारी, बीड यांच्या निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांचेमार्फ़त सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. चौकशीत तहसिलदार, माजलगांव हे वैद्यकीय रजेवर होते. व त्यांचा कार्यभार असलेले परिवीक्षाधीन तहसिलदार हे, बैठकी निमित्त जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे उपस्थित होते. तर नायब तहसिलदार व अव्वल कारकून, तहसिल कार्यालय माजलगांव हे अनधिकृतरित्या गैरहजर असल्याचे चौकशीत दिसून आल्याने जिल्हाधिकारी, बीड यांचे ज्ञापन दि.०७.११.२०१६ अन्वये नायब तहसिदार यांचेवर ठपका ठेवण्याची शिक्षा बजावण्यात आली आहे. तसेच दि.२४.१०.२०१६ चे ज्ञापनान्वये अव्वल कारकून यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

---

**आगरी, कोळी आणि करडी समाजाच्या भूमिहिन भूमिपूत्रांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(९) ७५३०५ (१३-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आगरी, कोळी आणि करडी समाजाच्या भूमिहिन भूमिपूत्रांचे पुनर्वसन करण्याकरिता सागरपुत्र रेतीवाला महासंघाने केलेल्या मागणीनुसार महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड आणि रायगड जिल्हाधिकारी यांना अभिप्राय देण्याचे निर्देश महसूल विभागाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्देशानुसार महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड आणि रायगड जिल्हाधिकारी यांनी अभिप्राय शासनास सादर केले आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) व (२) होय.
(३) सदर जागा ही सिडको संपादित असून खाडी भाग हा बंदरविकास विभागाकडे आहे. सदर जमिनी ह्या सिडकोकडे हस्तांतरीत झालेल्या असल्याने तसेच खाडीपात्र हे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे अखत्यारित असल्याने याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, सिडको व पर्यावरण विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन घेऊन तात्काळ कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील मुळाथडी परिसरातील पानेगाव, करजगाव, निम्भारी, तामसवाडी, लांडेवाडी आदी गावातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(१०) ८३३०९ (२०-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील मुळाथडी परिसरातील पानेगाव, करजगाव, अमळनेर, निम्भारी, वाटापूर, तामसवाडी, गणेशवाडी, लांडेवाडी या गावांच्या रस्त्यांची परिस्थिती अत्यंत खराब असून जागोजागी खड्डे आहेत व सुमारे १० वर्षापासून सदर रस्ता दुरुस्त करण्यासाठी कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची पहाणी केली आहे काय व पहाणीवरुन रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
प्रश्नाधीन पानेगाव, करजगाव, निम्भारी, गणेशवाडी येथील रस्त्यांच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाची कामे पूर्ण झाली असून रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे. तामसवाडी येथील रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत प्रगतीपथावर आहे. सदर कामे निधीची गरज व उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या फळबाग व सोयाबीन उत्पादन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(११) ८६८५८ (१५-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमध्ये फळबाग व सोयाबीनच्या उत्पादक शेतकऱ्यांस नुकसान भरपाई म्हणून अनुदान देण्याची घोषणा राज्य शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हेक्टरी किती रक्कम देण्याचे घोषित केले होते व किती हेक्टर पर्यंत अनुदान देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, किती शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली व किती शेतक-यांना अद्याप नुकसान भरपाई दिली नाही,
(४) असल्यास, याबाबत नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय, दिनांक ९ जानेवारी २०१७ अन्वये, राज्यात माहे जून ते ऑक्टोबर २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत मंडळनिहाय भरपाईची जी रक्कम मंजूर झाली असेल त्या रकमेच्या ५० टक्के रक्कम प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी न झालेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून २ हेक्टर मर्यादेपर्यंत देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्यानुसार शासन निर्णय दिनांक १९.०७.२०१८ अन्वये उस्मानाबाद जिल्हयात माहे जून ते ऑक्टोबर २०१६ च्या कालावधीत अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या १२०६४० शेतकऱ्यांच्या ११०४९३.८१ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी एकूण रु. ११२०६.९३ लक्ष एवढी मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोथरा नाला प्रकल्प व लाल नाला प्रकल्प (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत**

**(१२) ८८४४९ (१५-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोथरा नाला प्रकल्प व लाल नाला प्रकल्प (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील शेतकऱ्यांच्या प्रकल्पात गेलेल्या जमिनधारकांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरी किंवा प्रकल्पग्रस्त प्रत्येक कुटुंबास २० लाख रुपये देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी दिनांक ७ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल व पुनर्वसन, मदतकार्य मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०२-२०१९) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ दि.२७.१०.२००९ नुसार प्रकल्पग्रस्तांच्या व भूकंपग्रस्तांच्या नेमणुका जाहिरात देवून संबंधित पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमदेवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेव्दारे, गुणवत्तेनुसार करण्याची तरतूद आहे.

त्यानुसार प्रकल्पग्रस्तांना व भूकंपग्रस्तांना शासन सेवेतील गट “क” व “ड' मधील पदावर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत प्लास्टिक अच्छादन या घटकाचा समावेश करण्याबाबत**

**(१३) ९५६८० (२९-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे द्राक्ष बागांचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक अच्छादन या घटकाचा एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत समावेश करण्याची प्रधान सचिव, कृषी यांनी दिनांक २१ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास केंद्र शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत प्लास्टिक अच्छादन या घटकाचा समावेश करण्यासाठी प्रश्न भाग (१) अन्वये केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे का,

(३) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

यासंदर्भात शासनामार्फत दि.१८/०७/२०१६ व दि.२२/११/२०१६, संचालक स्तरावरून दि.०३/१२/२०१६ व दि.२४/०७/२०१७ तसेच १७/०३/२०१७ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे मागणी केली आहे.

(२) नाही.

(३) योजनेस मान्यता प्राप्त झालेली नाही तथापि, या संदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक विभागास कांदा चाळी उभारणीसाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीबाबत**

**(१४) १०१७७३ (२७-१२-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागास कांदा चाळी उभारणीसाठी सन २०१६-१७ मध्ये २९ कोटी ९३ लाख रुपये मंजूर निधी पैकी केवळ २१ कोटी ३६ लाख रुपयांचा निधी खर्च झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती निधी खर्च न करण्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
नाशिक विभागास कांदा चाळी उभारणीसाठी सन, २०१६-१७ मध्ये सुधारित लक्षांक एकूण रुपये २७९६.४७ लाख पैकी रुपये २७८६.४३९ लाख इतका निधी खर्च झाला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड मतदार संघातील पळशी, देवसरी, चातारी, संगमचिंचोली**
**या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१५) १०२११२ (२९-१२-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड मतदार संघातील पळशी, देवसरी, चातारी, संगमचिंचोली या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत सन २०१६ पासून स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पळशी, देवसरी, चातारी, संगमचिंचोली या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) देवसरी व चिंचोली (संगम) या पुरग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्याचा विभागीय आयुक्त, अमरावती यांनी शासनास पाठविलेला प्रस्ताव पुरपुनर्वसन धोरणानुसार नसल्याने सदर प्रस्ताव शासनाने अमान्य केला आहे. पळशी या गावाचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे. सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर त्याची तपासणी करुन, उचित निर्णय घेण्यात येईल. चातारी हे गाव पुरग्रस्त नसल्याने पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही, असे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या कार्यालयाने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासन निर्णयाप्रमाणे गौण खनिज निधी वाळु टेंडर काढलेल्या ग्रामपंचायतीला दिला जात नसल्याबाबत**

**(१६) १०४४४२ (१९-०२-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना, घनसावंगी व अंबड (जि.जालना) तालुक्यातील नदीपटटयातील वाळूचे टेंडर काढल्याने वाळु वाहतुकीमुळे रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे वाळुचे टेंडर काढल्यानंतर गौण खनिज निधी म्हणून ग्रामपंचायतीला दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निधी ग्रामपंचायतीला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लना, घनसावंगी व अंबड (जि.जालना) तालुक्यातील गोदावरी, दुधना, पुर्णा नदीच्या पात्रातून अधिकाऱ्यांच्या संगमताने वाळू उपसा सुरु असल्याबाबत.**

**(१७) १०४४४५ (१९-०२-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील जालना, घनसावंगी व अंबड तालुक्यातील गोदावरी, दुधना, पुर्णा नदीच्या पात्रातून अधिकाऱ्यांच्या संगमताने मोठया प्रमाणात वाळू उपसा सुरु केल्याने अवैध वाळु वाहतुकीमुळे रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार वाळुचे उत्खनन करण्यास जबाबदार महसूल अधिकारी व पोलीस यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे-मुलुंड दरम्यानचा कोपरी पुलाचे रुंदीकरण करण्याबाबत**

**(१८) १०४७८९ (१४-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक**

**(ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-मुलुंड दरम्यानचा वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा असलेला कोपरी पुल अरुंद असल्यामुळे या परिसरात निर्माण होत असलेली वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी कोपरी पुलाचे रुंदीकरण करणे तसेच भिवंडी बायपास रस्त्यावरील माणकोली उड्डाणपुल आणी रांजणोली येथील उड्डाणपुलाच्या कामासंदर्भात मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांचे मंत्रालयातील दालनामध्ये दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास बैठक घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर बैठकीत दोन्ही कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला व कामास आवश्यक ती गती निर्देश देण्यात आले. या निर्देशानुसार कोपरी येथील पुलाच्या रुंदीकरणाच्या कामास सुरुवात करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे भिवंडी बायपास रस्त्यावरील माणकोली उड्डाणपूल व रांजणोली उड्डाणपुलाच्या कामासंदर्भात कंत्राटदारास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य शासनाच्या नवीन वाळू धोरणाबाबत

**(१९) १०५०२९ (२७-०३-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू**

**कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने वाळू उत्खननासाठी नवीन धोरण आखले असून या धोरणात वाळू लिलावाच्या रकमेच्या प्रमाणात संबंधीत ग्रामपंचायतीला निधी देण्यात येणार असून सदर निधी त्या गावामधील रस्ते आणि आरोग्य विषियक सुविधांसाठी वापरला जाणार असल्याचे तसेच या धोरणांतर्गत वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्याचे अधिकार ग्रामसेवक आणि सरपंच यांना देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या धोरणांतर्गत वाळू उपसा करताना ठेकेदाराला २४ तास सी.सी.टीव्ही. कॅमेरा बसविणे बंधनकारक केले असून वाळू उत्खननासाठी जेसीबी वापरता येणार नसल्याचे तसेच सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळू उपसा करता येईल असेही बंधन घालण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धोरणाची प्रभावीरित्या अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) शासन निर्णय, दि. ३ जानेवारी, २०१८ नुसारच्या सुधारित वाळू/रेती निर्गती धोरणातील तरतूदीनुसार वाळू/रेतीगटाच्या लिलावामध्ये ग्रामपंचायतीस सहभागी करुन घेण्याच्या अनुषंगाने ग्रामसभेने वाळू लिलावास सहमती दिल्यास विनाअडथळा उत्खनन करणे शक्य झाल्यास लिलाव वर्ष संपल्यानंतर ठराविक रक्कम ग्रामपंचायतीला मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी कोणत्या बाबीसाठी वापरावा याचा उल्लेख सदर शासन निर्णयामध्ये करण्यात आलेला नाही. तसेच या धोरणांतर्गत वाळू लिलाव धारकाकडून वाहतूक करण्यात येणाऱ्या वाळूच्या वाहनासोबतच्या वाहतूक पासची तपासणी संबंधित गावच्या ग्रामसेवक व सरपंच यांना करता येईल अशी तरतूद केली आहे.

(२) वाळू लिलावधारकास सीसीटीव्ही कॅमेरा २४ तास बसविणे बंधनकारक करण्यात आले असून वाळू उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी अशा प्रकारच्या कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नसल्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीतच वाळू उपसा करण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

(३) दि.३ जानेवारी, २०१८ पासून सदर धोरण राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ओढा (ता.जि.नाशिक) येथे रेल्वे स्टेशन येथे गुड्स टर्मिनल बांधण्याबाबत**

**(२०) १०६६५१ (०१-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओढा (ता.जि.नाशिक) रेल्वे स्टेशन येथे गुड्स टर्मिनल निर्माण करणे हे काम शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २००९ रोजी वा त्यासुमारास अन्वये नाशिक विभाग विकास कार्यक्रमामध्ये मंजूर असूनही माहे जानेवारी २०१८ पर्यंत सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१९) :** (१), (२) व (३) नाशिक विभाग विकास कार्यकमांतर्गत ओढा (ता.जि.नाशिक) येथे गुडस टर्मिनल बांधण्याचा निर्णय घेण्यात आला होता. नाशिक रोड रेल्वे स्टेशन येथे सद्या असलेली मालहाताळणी क्षमता पुरेशी असल्याने तसेच ओढा नजीक खेरवाडी, निफाड आणि लासलगांव या तीन ठिकाणी गुडस टर्मिनल उपलब्ध असल्याचे मध्य रेल्वेने कळविले आहे. तसेच खाजगी सहभागातून गुडस टर्मिनल उभारण्याचे धोरण रेल्वे मंत्रालयाने आखलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई - अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे प्रकल्प रद्द करण्याबाबत**

**(२१) १०७०५४ (१९-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे प्रकल्पात तलासरी तालुक्यातील (जि.पालघर) ८ गावांतील १०९ भूखंड मिळूण एकूण ३० हेक्टर जमीन वापरली जाणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाला जमिनी न देण्याची भूमिका स्थानिकांनी घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाला होणारा विरोध लक्षात घेता सदर प्रकल्प रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१८-०२-२०१९) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अतिवृष्टी व परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेती व फळपिकांच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२२) १११९३ (०१-०४-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जून ते सप्टेंबर, २०१७ मध्ये अतिवृष्टीमुळे व माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये या कालावधीत परतीच्या पावसामुळे झालेल्या शेती व फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करुन पिकांच्या नुकसानीबाबतचा अहवाल क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालाची छाननी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१९) :** (१), (२) व (३) होय.

(४) राज्यात माहे एप्रिल, २०१७ ते माहे ऑक्टोबर २०१७ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासन निर्णय दिनांक १०.०७.२०१८ अन्वये एकूण रु.११०,०९,००,७५०/- एवढा निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इगतपुरी तालुक्यातील मुकणे धरणग्रस्तांच्या प्रलंबित असलेल्या विविध मागण्याबाबत**

**(२३) १११२१२ (१०-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी तालुक्यातील मुकणे धरणग्रस्तांच्या प्रलंबीत असलेल्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी नाशिक यांना दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार मुकणे धरणग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०२-२०१९) :** (१) होय.

(२) धरणग्रस्तांनी मुकणे धरणातुन ज्या कारखान्यांना पाणी दिले जाते, त्या कंपन्यांमध्ये सामावून घेण्याची मागणी केली असून मुकणे धरणातुन पाणी उचलणाऱ्या तीन कंपन्या आहेत. पाटबंधारे विभागाशी केलेल्या करारनाम्यानुसार प्रत्येक कंपनीने एकुण कामगाराच्या ५ टक्के कामगार प्रकल्पग्रस्त घेणे बंधनकारक आहे.

ज्या कंपन्यांनी पाटबंधारे विभागाशी केलेल्या करारानुसार प्रकल्प बाधितांना नोकरीत सामावुन घेतलेले नाहीत, अशा कंपन्या विरूध्द कारवाई करण्याबाबत कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग नाशिक यांनी निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांची नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(२४) ११४५७६ (०१-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसान भरपाई दीड ते दोन वर्षाचा कालावधी उलटूनही अदयापी मिळाली नसल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशीअंती अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१९) :** (१), (२) व (३) माहे जून ते ऑक्टोबर २०१६ मध्ये हिंगोली जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे ७९३४ शेतकऱ्यांच्या २२८४.१३ हेक्टर क्षेत्रावरील शेती/फळपिकाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

त्यानुसार शासन निर्णय दिनांक १९.०७.२०१८ अन्वये हिंगोली जिल्ह्यात माहे जून ते ऑक्टोबर २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना एकूण रु. १२७.९० लक्ष एवढी मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यात गारपीट व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(२५) ११५४६८ (०१-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात सन २०१६ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे व गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानाची मदत नैसर्गिक आपत्तीच्या केंद्र शासनाच्या निकषानुसार देण्याची मागणी लातूर ग्रामीण स्थानिक लोकाप्रतिनीधीनी मा.मुख्यमंत्री व मा.महसूल व मदत पुनर्वसन मंत्री यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किती मदत मंजूर करण्यात आली आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशीअंती सदर सन २०१६, २०१७ व २०१८ मधील जिल्हाधिकारी लातूर यांच्या पंचनामा व अहवालानुसार नुकसानीची मदत मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१९) :** (१) सदर बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) (३) व (४) लातूर जिल्ह्यात माहे जून ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पाऊस यामुळे झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत म्हणून शासन निर्णय दिनांक १९.०७.२०१८ अन्वये रु.५५२१.७२ लक्ष एवढी मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यात माहे जुलै ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीत अतिवृष्टी व पुर यामुळे झालेल्या शेतजमीनीच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत म्हणून शासन निर्णय दिनांक ०४.१२.२०१८ अन्वये रु.२६३.९६ लक्ष एवढी मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यात माहे मार्च २०१७ या कालावधीत झालेल्या गारपीट व अवेळी पाऊस यामुळे झालेल्या शेतीपिकाच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत म्हणून शासन निर्णय दिनांक १३.१२.२०१८ अन्वये रु.४४.७३ लक्ष एवढी मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यात माहे एप्रिल ते ऑक्टोबर २०१७ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पाऊस यामुळे झालेल्या शेतीपिकाच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत म्हणून शासन निर्णय दिनांक १०.०७.२०१८ अन्वये रु.९२.७६ लक्ष एवढी मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यात माहे फेब्रुवारी २०१८ या कालावधीत झालेल्या गारपीटीमुळे झालेल्या शेतीपिकाच्या व फळपिकाच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत म्हणून शासन निर्णय दिनांक ०३.०३.२०१८ अन्वये रु.१६४३.९३ लक्ष एवढी मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नियोजन प्राधिकरण झोन मधील जमिनीचे वाटप करणेबाबत व अतिक्रमणे काढणेबाबत**

**(२६) ११५७७४ (०४-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुनर्वसन प्रकल्पाच्या जमिनी अधिनियमाच्या कलम ११/१ व १३/३ नुसार अधिसूचित करून लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना / प्रकल्पबाधितांना लाभाक्षेत्रातील जमिनीचे वाटप केले जाते असे असताना काही जमिनी या नियोजन प्राधिकरणाच्या विशिष्ट झोनमध्ये समाविष्ट केल्यामुळे वाटप केले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसनाबाबत नियोजन प्राधिकरणा झोनबाबत कोणतीही तरतूद नसताना अशा जमिनी वाटप करताना प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून नकार दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभक्षेत्रातील वाटप जमिनींची किंमत हि शासकीय मुल्यांकनानुसार निश्चित केली जाते प्रकल्पबाधित क्षेत्रातील जमिनी जरी विशिष्ट झोन मध्ये तरी अशा जमिनी वाटप न झाल्याने शासनाने महसुलाचे नुकसान व अतिक्रमणे केली जातात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अतिक्रमणे काढणेबाबत व जमिनीचे वाटप करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०२-२०१९) :** (१) व (२) हे अशंत खरे आहे.

केवळ पुणे शहराचे लगत निवासी व औद्योगिक झोनची निर्मिती व नागरीकीकरण या बाबींमुळे त्या ठिकाणी असलेली शेती वहिती होऊ शकत नसल्यामुळे ती वाटप केली जात नाही. तथापि अन्य ठिकाणच्या शेतजमिनी नियमानुसार वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) हे अशंत खरे आहे. केवळ पुणे जिल्हयातील जमिनीवर केलेले अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खोपोली, रसायनी (जि.रायगड) येथील बेसीक केमिकल ॲण्ड इंटरमेडिएट प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमीन शेतकऱ्यांना परत करण्याच्या निर्णयाबाबत**

**(२७) १२०३१६ (०४-०८-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली, रसायनी (जि.रायगड) येथील बेसीक केमिकल ॲण्ड इंटरमेडिएट प्रकल्पाच्या नावाखाली सरकारने १९६० साली कमी भावाने संपादित केलेल्या जमीनीपैकी निम्म्याहून अधिक जागा अद्यापही वापराविना पडीक असल्याने शेतक-यांना परत करणेबाबतच्या निर्णयास दिनांक १ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाने मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयाची पुर्तता करण्याच्या दृष्टीने कोकण आयुक्त, जिल्हाधिकारी आणि प्रकल्प प्रतिनिधींची समिती गठीत करण्याचे आदेश देऊन या समितीच्या अहवालानुसार केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) तसेच सदरहू रसायनी येथील बेसीक केमिकल ॲण्ड इंटरमेडिएट प्रकल्पास दिलेल्या जमीनीपैकी विनावापर असलेली किती एकर जमीन, किती कालावधीपर्यंत शेतक-यांना, राज्य शासनातर्फे परत करण्यात येणार आहे याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

पनवेल व खालापूर तालुक्यांतील जमिनी बेसिक केमिकल ॲण्ड इंटरमेडिएट प्रकल्पासाठी संपादित केलेल्या नसून हिंदुस्थान ऑर्गेनिक केमिकल्स लिमिटेड (HOCL) या कंपनीसाठी संपादित करण्यात आलेल्या आहेत. या संपादित जमिनीपैकी ४४२ एकर जमीन भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (BPCL) कंपनीस व २० एकर जमीन भारतीय अवकाश संशोधन संघटनेस (ISRO) विकण्यासाठी शासनाने दिनांक ८.१.२०१८ रोजी ना हरकत दाखला दिलेला आहे.

(२) एचओसीएल प्रकल्पग्रस्त संघटनेच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यास्तव कायदेशीर बाबी तपासून अहवाल सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसारच्या दिनांक १२.३.२००४ रोजीच्या शासन निर्णयानुसार संपादित विनावापर जमीन मूळ भूधारकाला परत करता येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोवंडी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या शताब्दी रुग्णालयाच्या आवारात अवैधरित्या वाळूचा व्यवसाय करण्यात येत असल्याबाबत**

**(२८) १२६४३९ (३०-११-२०१८). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या शताब्दी रुग्णालयाच्या आवारात अवैधरित्या वाळूचा व्यवसाय करणाऱ्या मुरारी इंटरप्रायजेसच्या मुरारी चतुर्वेदी यांना दिनांक ९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास गोवंडी पोलीसांनी अटक करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शताब्दी रुग्णालयासह गोवंडी मधील इतर अनेक ठिकाणी नदी मधून बेकायदा उपसा केलेल्या रेतीचा स्टॉक करुन, मुंबईतील मोठया बांधकामांना प्रती ब्रास ६५०० ते ७००० रुपये दराने अवैध विक्री करण्यात येत असल्याचे पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशीनुसार गोवंडी येथे अवैध वाळूचा उपसा करून मुंबईत विक्री करणाऱ्या वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) गोवंडी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या शताब्दी रुग्णालयाच्या आवारात अवैधरित्या वाळूचा व्यवसाय करणाऱ्या मुरारी दयाराम चौबे या व्यक्तीविरुध्द गोवंडी पोलीस ठाणे येथे दि.६/९/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) गोवंडी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या शताब्दी रुग्णालयाच्या आवारात अवैधरित्या वाळूचा व्यवसाय करणाऱ्या मुरारी दयाराम चौबे या व्यक्तीविरुध्द दि.६/९/२०१८ रोजी गोवंडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत सदर रुग्णालयाच्या आवारातील शेड निष्काषीत करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वाळू उपसा व विक्रीच्या दरामधील तफावत दूर करण्याबाबत**

**(२९) १२६५५२ (३०-११-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नदीपात्रातीलवाळू उपसाबाबत शासनाचे दर आठशे रुपये प्रती ब्रास वाळू असून कंत्राटदाराचे राज्यातील बाजारात वाळू विक्रीचे दर आठ हजार रुपये प्रती ब्रास किंवा त्या जवळपास आहे तसेच मुंबई मध्ये वाळू विक्रीचा दर १८ हजार रुपये प्रती ब्रास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या वाळू उपसाच्या दरात आणि कंत्राटदारांच्या वाळू विक्रीच्या दरात मोठी तफावत असल्याने शासनाचे आणि ग्राहकांचेही नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार वाळू उपसासाठी कंत्राटरांवर योग्य दर आकारणी करून कंत्राटदारांमार्फत ग्राहकाकडून वाजवी दर घेण्यासाठी नियमावली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) शासनाकडून वाळूचे स्वामित्वधन व जिल्हाधिकाऱ्यांकडून वाळूगट लिलावासाठी हातची किंमत विहित करण्यात येते. वाळू विक्रीचे दर शासनाकडून निर्धारित केले जात नाही. बाजारात वाळूचे विक्रीचे दर हे पुरवठा व मागणी यांच्या अनुषंगाने ठरत असून शासन सदर दरांवर नियंत्रण ठेवत नाही, तसेच याकामी नियमावली करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

शासन निर्णय क्र.गौखनि-१०/०६१५/प्र.क्र. २८९/ख, दि.३ जानेवारी, २०१८ नुसार सुधारित वाळू/रेती निर्गती धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार वाळूच्या लिलावासाठी हातची किंमत निश्चित झालेनंतर लिलाव प्रक्रिया राबविण्यात येऊन लिलावास सर्वोच्च बोली नोंदविणाऱ्यास वाळूसाठा निश्चित कालावधीसाठी मंजूर करण्यात येतो. याप्रकारे स्पर्धात्मक दर निश्चित होत असल्याने शासनाचे महसूलाचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयामधील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या जागेबाबत**

**(३०) १२७५५८ (०४-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात सामाजिक न्याय कार्यालयाजवळील साडेतीन एकरच्या जागेवर प्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयाचा प्रस्ताव शासनास माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०२-२०१९) :** (१) व (२) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली या कार्यालयासाठी मौजे सांगली येथील गट क्र.१३८,१३९,१४०/२ मधील अस्तित्वात असलेल्या इमारतीच्या दुरुस्ती, वायरिंग व इतर कामकाज करण्यासाठीच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दि.१५.०१.२०१९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भुसावळ (जि.जळगाव) तालुक्यात उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(३१) १२७८७८ (१०-१२-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगाव) तालुक्यात उप प्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्यास लागणारे ५ निकष पूर्ण केल्यानंतरही शासनाने कार्यालय सुरु न केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्याची मागणी सन २००९ पासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन भुसावळ तालुक्यात उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०२-२०१९) :** (१), (२) व (३) शासन निर्णय दि. १८.०६.२०१८ अन्वये मोटार वाहन विभागांतर्गत नवीन प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्याबाबतचे निकष विहित केले आहेत. सदरहू निकषांची पूर्तता होत नसल्याने भूसावळ जि.जळगाव येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्यास परवानगी देता येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**म्हसवड (जि.सातारा) येथील माणगंगा नदीपात्रात पडलेल्या खड्डयाबाबत**

**(३२) १२९३४१ (३०-११-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसवड (जि.सातारा) येथील माणगंगा नदीपात्रात विश्रामगृह बंधारा ते स्मशानभूमी दरम्यान वाळू तस्करांनी महसूल प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे असंख्य खड्डे पाडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीपात्रात पडलेल्या खड्डयामुळे अपघात घडून मृत्यू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून नदीपात्राचे सपाटीकरण करुन नदी खड्डेमुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) व (२) माणगंगा नदीपात्र कोरडे असल्यामुळे मौजे म्हसवड (जि.सातारा) येथील माणगंगा नदीपात्रात विश्रामगृह बंधारा ते स्मशानभूमी या क्षेत्रात रात्री-अपरात्री केलेल्या वाळू चोरीमुळे खड्डे पडल्याची बाब माहे सप्टेंबर,२०१८ मध्ये निदर्शनास आली आहे. तथापि, नदीपात्र कोरडे असल्याने नदीपात्रातील खड्ड्यामुळे अपघात घडून मृत्यू होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(३) माणगंगा नदीपात्रातील सदर ठिकाणी पडलेले खड्डे यांत्रिकी सहाय्याने तात्काळ बुजविण्याची कार्यवाही महसूल प्रशासनामार्फत करण्यात आली आहे. सातारा जिल्ह्यात दि.०१/०४/२०१८ ते ३०/०८/२०१८ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या २५९ प्रकरणी कार्यवाही करुन रुपये २,४१,००,०००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तर २३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आमगांव-देवरी (जि.गोंदिया) तालुक्यात गौण खनीज उत्खनास परवानगी देण्याबाबत

**(३३) १३०४४८ (३०-११-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमगांव-देवरी (जि.गोंदिया) तालुक्यात अनेक ठिकाणी मंजूर असलेल्या विकास कामांसाठी गौण खनीज उपलब्ध होत नसल्यामुळे सुरू असलेल्या विकास कामात अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या तालुक्यात गौण खनिज उत्खननास परवानगी देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग व मा.खनिकर्म, मंत्री यांच्याकडे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वेखंडवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील गावठाणांस तारळी प्रकल्पाच्या पुनर्वसीत वसाहतीचा दर्जा व नागरी सुविधा देण्याबाबत**

**(३४) १३०६७० (१०-१२-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुशी (ता.पाटण, जि.सातारा) या गावातील तारळी धरण प्रकल्पात बाधीत झालेल्या २१ प्रकल्पग्रस्तांना मायणी (ता.खटाव) या ठिकाणी पुनर्वसनाकरीता भूखंडाचे वाटप करण्यात आले असता या प्रकल्पग्रस्तांना हे मान्य नसल्याने या प्रकल्पग्रस्तांनी भूखंड व जमिनीचा ताबा न घेता तालुक्यातील वेखंडवाडी याठिकाणी स्वखर्चाने जमिन खरेदी करुन गावठाण वसविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मायणी (ता.खटाव) या ठिकाणी पुनर्वसनाकरीता सोयी नसल्याने आणि देण्यात आलेल्या जमिनी नापिक असल्याने वेखंडवाडी (ता.पाटण) याठिकाणी स्वखर्चाने जमिन खरेदी करुन वसविलेल्या गावठाणांस विशेष बाब म्हणून मंजूरी देवुन १८ नागरी सुविधा देण्याबाबत प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची कोणतीही परवानगी न घेता वेखंडवाडी (ता.पाटण) येथे जमीन खरेदी करुन गावठाण वसविल्याने या गावठाणांस पुनर्वसन गावठाण म्हणून मंजूरी देणे योग्य होणार नसल्याचा अहवाल उपजिल्हाधिकारी पुनर्वसन सातारा यांनी उपआयुक्त (पुनर्वसन), पुणे विभाग, पुणे यांना सादर केला असल्याने वेखंडवाडी येथील कुशी प्रकल्पग्रस्तांच्या गावठाणास अद्यापही पुर्नवसाहतीचा दर्जा मिळाला नसल्याचे तसेच यामुळे या प्रकल्पग्रस्तांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन वेखंडवाडी येथील गावठाण या २१ प्रकल्पग्रस्तांसाठी विशेष बाब म्हणून मंजूर करण्याबाबत व १८ नागरी सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर वसाहतीस पुनर्वसन दर्जा मिळण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करता येणार नाही असे उपआयुक्त (पुनर्वसन), पुणे यांनी कळविले आहे.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**मौजे उमरकांचन (ता.पाटण, जि.सातारा) येथील वांग मराठवाडी धरण प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३५) १३०६७४ (१०-१२-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यात सन १९९७ मध्ये सुरु झालेल्या वांग मराठवाडी या धरणाचे काम ४० टक्केच पुर्ण झाले असून मागील १७ वर्षापासून सदर धरणाचे काम बंद अवस्थेत आहे, तसेच वांग मराठवाडी धरण प्रकल्पातंर्गत मौजे उमरकांचन येथील ६१ बाधित कुटुंबाना सन १९९७ पासून धरणग्रस्त म्हणून कोणताही मोबदला किंवा जमीन दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरकांचन येथील ६१ बाधित कुटुंबाना सांगली जिल्ह्यातील जमिन पुर्नवसनाकरीता दिलेली आहे मात्र सदर जमिन ही कसण्यायोग्य तसेच गावाचे पुनर्वसन करण्यायोग्य नसल्याने ६१ बाधित कुटुंबानी या प्रकल्पातील २१८ प्रकल्पग्रस्तांप्रमाणे रोख रक्कम देण्यात येवून उमरकांचन येथील जुन्या गावठाणाच्या वरील बाजूस असणा-या गट नं.६१, ६२, ६७, ६९ व ७२ या खाजगी जागेमध्ये विशेष बाब म्हणून पुनर्वसन करणेस मान्यता देणेविषयी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत सातारा पाटबंधारे विभागाने तयार करुन तो मान्यतेकरीता शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वांग मराठवाडी धरण प्रकल्पातील ६१ बाधित धरणग्रस्त कुटूंबाचे मागणीसह पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) याबाबत कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**मे.दिलीप बिल्डकॉन प्रा.लि. कंपनीवर कारवाई करण्याबाबत**

**(३६) १३०८९८ (३०-११-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साळगाव (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथिल सर्व्हे क्र.९२ हिस्सा क्र.८ ही जमीन श्री.विठ्ठल दशरथ धुरी व अन्य १२ यांच्या मालकीच्या जमिनीमध्ये ५१०२ ब्रास व सर्व्हे क्र.१०२ हिस्सा क्र.२ या श्री.दशरथ वासुदेव धुरी व अन्य ३३ यांच्या मालकीच्या जमिनीमध्ये १५७८७

ब्रास मातीचे असे एकूण २०८८९ ब्रास मातीचे अनधिकृत उत्खनन मे.दिलीप बिल्डकॉन प्रा.लि. कंपनीने केले असून त्याबाबत तलाठी, साळगाव यांनी दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास पंचनामाही केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तलाठी साळगाव यांनी पंचनामा केल्यानंतरही अद्यापपर्यंत संबंधित कंपनीवर दंडात्मक कारवाई केली नसल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४८(७) अनुसार पाचपट दंडात्मक कारवाई करण्यासंदर्भात श्री.अनुपम कांबळी यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार मे.दिलीप बिल्डकॉन प्रा.लि. कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) मौजे साळगांव (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) येथील स.न.९२, हि.नं.८ व स.नं.१०२, हि.नं.२ या खाजगी मालकीच्या जमिनीमधून माती उत्खनन केल्याबाबत तहसिलदार, कुडाळ यांचेकडे प्राप्त तोंडी तक्रारीनुसार तलाठी, साळगांव यांनी दि.२६ मार्च,२०१८ रोजी पंचनामा केला हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ करीता आवश्यक असणाऱ्या १५,००० ब्रास माती या गौणखनिजासाठी मे.दिलीप बिल्डकॉन लि., या कंपनीने मौजे साळगांव, ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग येथील स.क्र.१०२/२ या जमिनमालकाशी केलेल्या करारनाम्यानुसार स्वामीत्वधन व इतर शासकीय कर आगाऊ भरणा करुन घेऊन उत्खनन केले असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मौजे साळगाव, ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग येथील स.क्र.९२, हिस्सा क्र.८ या जमीनीमधून मे.दिलीप बिल्डकॉन प्रा.लि., या कंपनीने मातीचे अनधिकृत उत्खनन केल्याचे आढळून आल्याने तहसिलदार, कुडाळ यांनी दि.१८/१/२०१९ रोजी दंडात्मक आदेश पारित केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना देय निधी मिळणेबाबत

**(३७) १३१०८६ (१०-१२-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल व बँक कर्मचारी यांच्यातील ताळमेळ व शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलतेचा अभाव यामुळे खरीप हंगाम सन २०१६ मध्ये अतिवृष्टीमुळे १ लाख २० हजार ६४० शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसान भरपाईपोटी शासनाने जिल्हा प्रशासनाकडे ११२ कोटी ६ लाख ९३ हजार रुपयांचा निधी वर्ग करुनही अद्यापही त्याचे वितरण झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सव्वा दोन महिन्यांपूर्वी जिल्हा प्रशासनाने तालुका निहाय निधी वितरीत करुन शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे आदेश तहसीलदारांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आदेशान्वये कार्यवाही करत अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना निधी न देणाऱ्या संबंधित महसूल व बँक कर्मचारी, अधिकारी यांचे विरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१), (२) व (३) एप्रिल ते नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याकरीता शासन निर्णय क्रमांक एससीवाय-२०१८/प्र.क्र.३६/म-११, दि०२०/७/२०१८ अन्वये राज्यामध्ये रु.५१५,२४.०७ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला.

यापैकी, औरंगाबाद विभागातील उस्मानाबाद जिल्हयाकरीता रु.११२०६.९३ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांनी संबंधित तहसिलदारांना उपलब्ध करून दिलेला निधी ९८०१२ बाधीत शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम रुपये ५८,९३,८६,३३५/- जमा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### भूसंपादनासाठी बाजारमूल्य दरानुसार मोबदला देण्याबाबत

**(३८) १३१३०० (३०-११-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास स्वतंत्र अध्यादेश काढून भूसंपादनासाठी बाजारमूल्य दरानुसार मोबदला देण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयाची राज्यात किती ठिकाणी अंमलबजावणी करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

दि.१३ ऑगस्ट, २०१८ रोजीचा अध्यादेश नसून दि.१३ ऑगस्ट,२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये निर्णय घेण्यात आला आहे.

(२) कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर या सर्व विभागांत सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. उपरोक्त सर्व विभागात सर्व जिल्हाधिकारी यांच्या मार्फत विविध प्रकल्पांसाठी सार्वजनिक प्रयोजनाकरिता संपादित करण्यात येणा-या जमिनीसाठी मोबदला निश्चित करताना उक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना व आदिवासी उपायोजनेंतर्गत नवीन विहीरीचा लाभ देण्याच्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्याबाबत**

**(३९) १३१८१८ (०४-१२-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना व आदिवासी उपायोजनेंतर्गत नवीन विहीरीचा लाभ घेण्यासाठी असलेल्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा होणेबाबत कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी कृषी संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र यांना जि.प/कृषी/विघयो/४०३/२०१८ दि.२८/०२/२०१८ च्या पत्रांनुसार मुद्देनिहाय प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेमधील अटी व शर्तीनुसार नवीन विहीर घ्यावयाच्या स्थळापासून ५०० फुटाचे अंतरावर दुसरी विहीर नसावी अशी अट असून अनुसूचीत जाती जमातीचे शेतकरी अल्प भूधारक असल्याने प्रस्तावीत विहीरीकरीता स्थळाची पाहणी केली असता ५०० फुटाचे आत दुसरी विहिर अस्तीत्वात असल्यामुळे लाभार्थी अपात्र ठरवून निवड रद्द करावी लागत असल्याचे लोकप्रतिनिधींनी अव्वर मुख्य सचिव, कृषी विभाग यांना दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्रांनुसार कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर योजनेतील अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात आले होते. यासंदर्भात, दोन सिंचन विहिरींमधील किमान अंतर १५० मी. (५००फुट) ठेवणे भूजल शास्त्रीयदृष्ट्या आवश्यक असून ते शेतकऱ्यांचे हिताचे असल्याचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांनी कळविले होते. त्यामुळे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सदरचे अभिप्राय विचारात घेऊन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वालंबन योजना व आदिवासी उपयोजना अंतर्गत नवीन विहीराचा लाभ घेण्यासाठी विहीत करण्यात आलेली ५०० फुटाची अट शिथील करता येणार नसल्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स यांना सचिव (कृषी) यांच्या स्तरावरून दि. १५.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे घेरा सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत क्षेत्रातील आतकरवाडीस गावठाण दर्जा देण्याबाबत**

**(४०) १३१८५० (३०-११-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घेरा सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत क्षेत्रातील आतकरवाडीस गावठाण दर्जा देण्याच्या प्रस्तावाची चौकशी उपविभागीय अधिकारी, हवेली यांनी करून दिनांक ४ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास अहवाल सादर केला असून दिनांक ८ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास मोजणी होऊन गावठाण लगतचे भूमापन क्रमांक ही दर्शविण्यात आले असताना या गावास गावठाण दर्जा देण्याची कार्यवाही संथ गतीने सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावठाणामध्ये समाविष्ट करावयाचे सर्व्हे नं.१९७ व २५१ या सरकारी वनाबाबत मुख्य वनसंरक्षक, पुणे विभाग यांना दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्याचे कळवून तीन वर्षे झाले असतांनाही अद्यापपर्यंत अभिप्राय प्राप्त झाले नाही व त्याबाबत संबंधितांकडून कोणतेही प्रयत्न केले जात नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशीनुसार आतकरवाडीस गावठाण दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे की, मौजे घेरा सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) या गावास गावठाण दर्जा देणे संदर्भात गावठाणामध्ये समाविष्ट करावयाचे स.नं.१९७ व २५१ हे सरकारी फॉरेस्ट आहेत. तसेच मौजे घेरा सिंहगड व त्यांच्या वाड्या या पूर्णपणे पश्चिमघाट परिसंवेदनशील क्षेत्रामध्ये समाविष्ट आहेत.

मौजे घेरा सिंहगड (आतकरवाडी) या गावास गावठाण दर्जा देणे संदर्भात गावठाणामध्ये समाविष्ट करावयाचे स.नं.१९७ व २५१ हे सरकारी फॉरेस्ट असल्याने, मुख्य वनसंरक्षक, पुणे विभाग, पुणे यांना अभिप्राय सादर करण्यास कळविले आहे. मुख्य वनसंरक्षक, पुणे विभाग, पुणे यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर, नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भामा आसखेड धरण (ता.खेड, जि.पुणे) प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाचा मोबदला म्हणून पर्यायी जागा अथवा विशेष पॅकेज देण्याबाबत**

**(४१) १३२०३५ (०७-१२-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड प्रकल्प (ता.खेड, जि.पुणे) या प्रकल्पाचे पाणी पिण्यासाठी आणि औद्योगिकिकरणासाठी पुरविण्याच्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या भूसंपादन व पुनर्वसनासाठी सविस्तर आराखडा तयार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच प्रकल्पग्रस्तांचे सर्व प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत निर्णय घेवून कालबद्ध कार्यक्रम तयार करण्याची लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे केली आहे, तसेच न्यायालयात गेलेल्या प्रकल्पग्रस्तांना तात्काळ पर्यायी जमीन अथवा पॅकेज देण्याचा निर्णय घेण्यासाठी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे झालेल्या बैठकीमध्ये मोबदला म्हणून जमीनच देण्यात यावी असा निर्णय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटप करण्यासह उर्वरित प्रकल्पग्रस्तांना जमीन अथवा विशेष पॅकेज देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या ३८८ प्रकल्पग्रस्तांना त्यांची पात्रता तपासून पर्यायी जमिन वाटप करण्याबाबची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**राज्यात स्कूल बसच्या व्याख्येत विशिष्ट सुरक्षिततेचे उपाय असलेल्या स्कूल व्हॅन, ऑटो रिक्षा व इतर वाहनाचा समाविष्ट करणाऱ्या कायद्याबाबत**

**(४२) १३२१४२ (११-१२-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्कूल बसच्या व्याख्येत विशिष्ट सुरक्षिततेचे उपाय असलेल्या स्कूल व्हॅन, ऑटो रिक्षा व इतर वाहनाचा समाविष्ट करणारा कायदा राज्य सरकारने केला असला तरी त्याला अद्याप मा.राष्ट्रपतीची संमती मिळालेली नसल्याने हा कायदा लागू करुन अशा वाहनांना परवानगी देण्याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश मा.न्यायालयाने माहे ऑक्टोबर, २०१८ वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्देशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०२-२०१९) :** (१) व (२) राज्य शासनाने स्कुलबस करीता केलेला नियम केंद्र शासनाने केलेल्या नियमांशी सुसंगत आहेत काय याबाबत मा.महाधिवक्ता यांनी मा.उच्च न्यायालयासमोर बाजू मांडली असून प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दौंड व पुरंदर (जि.पुणे) तालुक्यासाठी स्वतंत्र उपविभागीय कार्यालय सुरु करण्याबाबत

**(४३) १३३०६० (३०-११-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड व पुरंदर (जि.पुणे) तालुक्यासाठी स्वतंत्र उपविभागीय कार्यालय सुरु करणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास वारंवार शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने पुरंदर येथे तात्पुरत्या स्वरुपात कार्यालय सुरु केले असून पुरंदर पेक्षा दौंड महसुल विभागाच्या कामाची व्याप्ती दुप्पटीपेक्षा जास्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर व्याप्ती व वाढणारे नागरीकीकरण पाहता उक्त दोन्ही तालुक्यासाठी स्वतंत्र उपविभागीय कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०२-२०१९) :** (१) होय
(२) पुरंदर तालुक्यापेक्षा दौंड तालुक्याची कामाची व्याप्ती जास्त असल्याचे दिसून येते.
(३) दौंड व पुरंदर या दोन तालुक्यांसाठी स्वतंत्र उप विभागीय कार्यालय स्थापन करण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडून दिनांक २७.११.२०१८ अन्वये अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालातील बाबी शासन स्तरावर तपासून उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शिवाजीनगर एस टी स्थानक स्थलांतरित करण्याबाबत

**(४४) १३३२३० (११-१२-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील पिंपरी चिंचवड ते स्वारगेट मेट्रो मार्गात शिवाजीनगर एस.टी स्थानकाच्या जागेखाली भुयारी मेट्रो स्थानक नियोजित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराचे मुख्य वाहतूक केंद्र असलेले शिवाजीनगर एस. टी. स्थानक तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरित करावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवाजीनगर एस.टी स्थानक येथील प्रवाशांची संख्या लक्षात घेता सदर स्थानक नागरिकांच्या व एस टी महामंडळाच्या सोयीच्या जागेवर स्थलांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) व (२) होय.

(३) पुणे मेट्रो प्रकल्पाच्या कामासाठी राज्य परिवहन महामंडळाचे शिवाजीनगर एस.टी. स्थानकाचे स्थलांतरण आवश्यक असल्याने, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभागाच्या दि.०२.०१.२०१९ च्या शासन निर्णयांन्वये दुग्धव्यवसाय विभागाची जागा ३ वर्षाच्या कालावधीकरीता करारनाम्याने राज्य परिवहन महामंडळास उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरात प्रादेशिक परिवहन खात्याकडून स्मार्ट कार्ड रीडरचा पुरवठा करण्याबाबत

**(४५) १३३४४८ (१५-१२-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागाकडून वाहन नोंदणी धारकांना सन २००६ पासून स्मार्ट कार्ड देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू स्मार्ट कार्ड रीडर पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयांना देण्यात आली नसुन नव्या वाहनांची नोंद करताना पुणे प्रादेशिक कार्यालयाकडून स्मार्टकार्डसाठी प्रत्येकी २०० रुपये शुल्क आकारण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्मार्टकार्ड रीडर पुरवठा न केल्याने स्मार्टकार्ड वापरण्याचा हेतू साध्य न होता नागरीकांना नाहक भुर्दंड बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे शहरात प्रादेशिक परिवहन खात्याकडून स्मार्ट कार्ड रीडरचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय,पुणे या कार्यालयास प्रायोगिक तत्वावर ४ स्मार्ट कार्ड रिडर्स उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. स्मार्ट कार्ड स्वरुपातील नोंदणी प्रमाणपत्रासाठी रु.२००/- शुल्क आकारण्यात येते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहरात रिक्षा थांबे वाढविण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४६) १३३४७८ (११-१२-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील वाढती लोकसंख्येचा तुलनेत रिक्षा थांबे वाढविण्याचा प्रस्ताव मागील काही वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा प्रस्तावावर अद्यापपर्यंत निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नाशिक शहरात रिक्षा थांबे वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही. असा कोणताही प्रस्ताव शासनाचे स्तरावर प्रलंबीत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईत रेल्वे रुळ ओलांडताना होणाऱ्या अपघाताबाबत**

**(४७) १३३५०६ (११-१२-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत रेल्वे रुळ ओलांडताना होणाऱ्या अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असुन मागील ३३ महिन्यांमध्ये रेल्वे अपघातात ४ हजार ६६१ जणांना प्राण गमवावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेल्वे कायदा १९८९ अन्वये कलम १४७ अंतर्गत रुळ ओलांडणे गुन्हा असुन हे प्रमाण कमी होत नाही त्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राज्यातील रेल्वे अपघात रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :** (१) सन २०१६ मध्ये १७९८, सन २०१७ मध्ये १६५१,तर सन २०१८ (नोव्हेंबर अखेर) १४७६ व्यक्तींचा रेल्वे ओलांडताना मृत्यू झालेला आहे.

(२) मागील ३३ महिन्यात मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षैत्रात रुळ ओलांडताना लोकलखाली सापडून ४४७२ जणांना प्राण गमवावे लागले आहेत.

(३) व (४) प्रवाशांना माहिती असूनही त्यांच्या अतिसुविधा घेण्याच्या प्रवृत्तीमुळे असे अपघात होत आहेत. यासंदर्भात खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

i) नियमितपणे नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येते.

ii) काही ठिकाणी कुपण भिंती घालण्यात आल्या आहेत.

iii) अपघातानंतर काळी ठिकाणे (ब्लॅक स्पॉट) शोधून अशा ठिकाणी रेल्वे पोलीस दलाचे कर्मचारी नियुक्त करण्यात येत आहेत.

iv) सरकते जिने आणि लिफ्टस बसविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात स्कूलबस बेकायदेशीररित्या चालविण्यात येत असल्याबाबत**

**(४८) १३३५०७ (११-१२-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात एकूण ३१८ स्कूल बस बेकायदा असून त्यापैकी ३१६ बसवर कारवाई करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन नियमांचे उल्लंघन करुन बेकायदेशीररित्या स्कूल बस चालविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीर स्कूल बस चालत असल्यामुळे मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असुन केंद्र सरकारने स्कूलसंदर्भात आखलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन राज्य शासन करीत आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राज्यात बेकायदेशीर स्कूल बस चालविणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

राज्यातील सर्व परिवहन कार्यालयांना शालेय विद्यार्थ्यांची अवैध वाहतूक करणाऱ्या व स्कुल बसेस नियमावलीतील तरतूदींचे उल्लंघन करणाऱ्या स्कूल बसेसची तपासणी करण्यासाठी दि.०१.१०.२०१८ ते दि.१५.१०.२०१८ पर्यंत विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. सदर तपासणीमध्ये शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या अवैध वाहनांची संख्या ३१६ एवढी आढळून आली.

(२) व (३) राज्यातील परिवहन कार्यालयातील वायुवेगपथकांमार्फत शालेय विद्यार्थ्यांची अवैध वाहतूक करणाऱ्या तसेच स्कूल बस नियमावलीतील तरतूदींचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची तपासणी करून दोषी वाहनांवर कावाई करण्यात येते. त्यानुसार सन २०१८ मध्ये ३११३ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवाहतूकदारांना प्रतिगाडी काही रक्कम संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयात दयावे लागत असल्याबाबत**

**(४९) १३३८४१ (११-१२-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जडवाहनांच्या मालवाहतुकीची क्षमता केंद्र शासनाने दोन ते सहा टनांनी वाढविली असुन त्यांची नोंदणी करुन घेताना मालवाहतूकदारांना प्रतिगाडी दीड ते दोन हजार रुपये संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयात दयावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने १६ टन २०० किलोपेक्षा जास्त वजन असलेल्या जड वाहनांची क्षमता दोन ते सहा टनांनी वाढविली आहे परंतु मालवाहतूकदारांनी त्याबाबत नोंदणी प्रमाणपत्रावर (आरसी) आणि परमिटवर नोंद करणे बंधनकारक केले असुन यासर्व प्रक्रियेत काही मध्यस्थ मालवाहतूकदारांकडून प्रतिगाडी दीड ते दोन हजार रुपये आकारत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०२-२०१९) :** (१) दि. ८ सप्टेंबर २०१८ रोजीच्या दैनिकामध्ये वृत्त प्रसिद्ध झाले आहे, वाहनाची वजनक्षमता वाढविण्यासंदर्भात शासनाने विहित केलेले शुल्क रु. ९५०/- व दुय्यम परवान्याकरीताचे शुल्क रु. २००/- याप्रमाणे एकूण ११५०/- शुल्क भरणे आवश्यक असून एवढीच रक्कम स्विकारली जाते.

(२) व (३) याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. याकामी मालवाहतुकदारांसाठी एक खिडकी योजना तसेच अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करुन नोंदणी प्रमाणपत्र आणि परवान्यावर नोंद घेतली जाते. कार्यालयीन कामकाजासंदर्भात कोणत्याही मध्यस्थांशी संपर्क न करण्याबाबत दर्शनी भागात सूचनाफलक ठळकपणे दिसतील अशा पद्धतीने लावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारणीबाबत**

**(५०) १३३९६० (११-१२-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात माल वाहतूक करणाऱ्या नव्या वाहनांच्या तपासणीसाठी ब्रेक टेस्ट ट्रॅक नसल्यामुळे माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना टेस्टिंगसाठी व योग्यता प्रमाणपत्रासाठी कराड उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे वाहनांची नोंदणी करावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा जिल्हयातील माल वाहतूकदार वर्षाला १२३ कोटींचा महसूल देत असुन ट्रॅकसाठी निधी असतांना उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे ट्रॅकसाठी जागा उपलब्ध होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन टेस्टिंग ट्रॅकसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे
(२) व (३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,सातारा कार्यालयाकरीता २५० x ६ मीटर लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्यासाठी महसूल व वन विभागाच्या दि.२३.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मौजे वर्ये ता.जि.सातारा येथील गायरान गट क्र.४८६/२, क्षेत्र ६ हेक्टर ५३ आर पैकी क्षेत्र २ हेक्टर एवढी जमिन प्रदान करण्यात आली आहे. सदर जमिनीवर ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारणीच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दि.३०.०१.२०१९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.